# २०१२ - आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष



संयुक्त राष्ट्र संघाने २०१२ हे वर्ष ''आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष'' म्हणून जाहीर केले आहे. सहकार चळवळीत काम करणाऱ्या प्रत्येकाला ह्या निमित्ताने सिंहावलोकन करून संकल्प सोडता येणे शक्य आहे. चांगल्या समाज निमिर्तीसाठी व भरभक्कम आर्थीक उभारणीसाठी ''**सहकार** '' हाच उपयोगी पडू शकतो, याचा वेध प्रत्येकाने घेण्यासाठी २०१२ हे वर्ष आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष म्हणून जे साजरे होत आहे याचा उपयोग करून घेण्यासारखा आहे. सहकारी संस्थेचे हीत हे **संस्थेची प्रगती व सभासदांचे आर्थिक उत्थान** यावर अवलंबून असते. ह्यासाठी **सहकारी चळवळीतील प्रत्येकाने सहकाराचे प्रशिक्षण घेणे** कायद्यानेच बंधनकारक यापुढे करावे लागेल.

सहकाराचे प्रशिक्षण न घेता व कुठलीही परिक्षा न देता जन्मास येणाऱ्या सहकारी संस्थांची खऱ्या अर्थाने वाढझाल्याचे राज्यात ऐकीवात नाही. महाराष्ट्र राज्याचा खऱ्या अर्थाने आर्थिक कणा हा **सहकारी चळवळ** आहे. राज्यात उभे राहिलेले सहकारी साखर कारखाने, सुतगिरण्या, इतर प्रक्रिया सहकारी संस्था यांचे व्यवस्थितपणे व निःपक्षपातीपणे जर समालोचन केले तर, ९० टक्के कारखाने पुर्णपणे मोडकळीला आलेले आहेत. केवळ हे कारखाने मोडकळीस आलेले नसून शासनाचे म्हणजे जनतेचे लाखो कोटी रूपये बुडाल्यात जमा आहेत. याला एकमेव कारण म्हणजे, **प्रशिक्षीत नसणाऱ्या व नंतरच्या नजीकच्या काळात सुध्दा प्रशिक्षण न घेणाऱ्या संचालकांची खोगीर भरती**. यापेक्षा वेगळे कुठलेच कारण या कारखान्यांच्या डबघाईस नाही. प्रशिक्षीत नसणाऱ्या तथाकथित विद्वानांनी एकत्रित यायचे, भोळ्या - भाबड्या जनतेकडून ५ टक्के रक्कम भाग रूपाने जमा करायची व उर्वरीत ९५ टक्के रक्कम शासन व वित्तीय संस्थांकडून लाटायची, संस्था तोट्यात आणायची व नंतर पुन्हा शासनाकडून केव्हा सवलतीच्या दरात, केव्हा बिनव्याजी, केव्हा पॅकेज म्हणून लाखो करोडो रूपये पुन्हा लाटायचे. म्हणजे जनतेच्या खिशातून टॅक्स रूपाने काढून घेतलेला पैसा शासनाने राज्यातल्या त्या महाभागांना सहकारी संस्थांच्या माध्यमातून उपलब्ध करून द्यायचा. हा खेळ गेल्या ३० ते ३५ वर्षांपासून आपल्या राज्यात राजरोसपणे चालू आहे. **या सहकारी**

**कारखान्यातील अप्रशिक्षीत संचालक याला कारणीभूत आहेत**. संचालक मंडळातील हे अप्रशिक्षीत सदस्य केव्हाही संस्थेचा उपविधी वाचत नाहीत. नियमाप्रमाणे संचालक मंडळाच्या सभेच्या नोटीसीबरोबर टिपण्णीची मागणी करीत नाहीत. **सभेपुर्वी किंवा सभेनंतर हजेरी बुकवर सह्या करतात**. **लेखापरिक्षण अहवाल व पुर्तता अहवाल वाचीत नाहीत.** आणि त्याचाच गैरफायदा त्या संस्थेतील तथाकथित महाभाग घेतात. संस्थेचे पूर्णपणे वाटोळे करून नाबार्ड, राज्य व केंद्र शासन व वित्तीय संस्था यांना फसविण्याचे काम बिनधोकपणे राज्यात चालू आहे. परंतु ह्या सर्व गोष्टींचा जाब ह्या कारखान्यांमधील एकही संचालक विचारण्यास तयार नाही, कारण त्यालाच काही समजत नाही व **ज्याला समजते तो थोडयाशा किरकोळ आर्थिक फायद्यासाठी आपली सर्व बुध्दी गहाण ठेवतो.** संस्थेचे वाटोळे करण्यासाठी कळत नकळत हातभार सुध्दा लावतो आणि ह्यासाठी ह्या सर्व गोष्टीला उपाय म्हणजे ''**प्रशिक्षण हाच होय.**''

ह्या २०१२ आंतरराष्ट्रीय सहकार वर्षात सहकारातील प्रत्येकाने किमान आपल्या सहकारी संस्थेच्या यशासाठी जे जे करणे आवश्यक आहे, त्यातील काही मुद्यांचा परामर्श यानिमित्ताने आम्ही करू इच्छितो, तो खालिलप्रमाणे :-

१. प्रत्येकाने आपल्या सहकारी संस्थेचा उपविधी ३६५ दिवसांमधून एकदा वाचला पाहिजे. तो समजून आत्मसात करण्याएवढे चिंतन करावयास पाहिजे. (हा उपविधी वाचण्यास केवळ ४ तास लागतात. )

२. उपविधीमध्ये सहकार कायद्यातील ज्या कलमांची वाच्यता होते, ती कलमे सहकार कायद्याच्या पुस्तकातून स्वतंत्र बाहेर काढून त्याचे वाचन करणे आवश्यक आहे.

३. प्रत्येकाने आपल्या मातृभाषेत सहकार कायद्याचे पुस्तक आपल्या घरी / कार्यालयात सतत उपलब्ध ठेवणे आवश्यक आहे. आणि ज्या-ज्या वेळेस या सहकार कायद्याच्या पुस्तकाचा आधार घ्यावयाचा असेल, त्या-त्या वेळेस त्याचे सुक्ष्मपणे वाचन होणे आवश्यक आहे.

४. वर्षातून किमान ३ वेळा सहकारी संस्थांच्या कार्यक्रमात सहकारी भावना वृध्दींगत होण्यासाठी सामील होणे आवश्यक आहे.

५. प्रत्येक वर्षी प्रत्येकाने सलग किमान ३ दिवस सहकाराचे प्रशिक्षण घेणे आवश्यक आहे. **केवळ लेखापरिक्षणाच्या वर्गवारीतील ३० मार्कांसाठी हे प्रशिक्षण घेवू नये.**

६. संचालक मंडळाच्या सभेची विषयपत्रिका व त्यावरील टिपण्णी याचे पूर्णपणे वाचन करणे ही आपली जबाबदारी आहे, असे समजून विश्वस्ताची भूमिका बजावणे आवश्यक आहे.

७. सहकाराचे भवितव्य उज्ज्वल करण्यासाठी प्रत्येकाने आपली कार्यक्षमता आणि पारदर्शकता वाढवणे आवश्यक आहे आणि त्यासाठी **सहकाराला एक पवित्र व पारदर्शक व्यवसाय** म्हणून स्विकारले पाहिजे.

८. प्रामुख्याने सहकारात राजकीय इच्छाशक्ती ही वरदान ठरावयास हवी. परंतु राजकीय नेतृत्वाची एखाद्या सहकारी संस्थेतील हुकुमशाही ही सहकारी संस्थेत मारक कुठल्याही परिस्थितीत ठरता कामा नये, याचे भान प्रत्येकाने ठेवले पाहिजे.

९. प्रत्येकाने श्रध्दा, निष्ठा व जीवनमुल्य यांचा पुर्ण संगम सहकारात तयार करावयास पाहिजे.

१०. सहकारातील प्रत्येकाने प्रसिध्दीपासून दूर राहून दुसऱ्याच्या योगदानाविषयी सतत बोलत राहणे व कुठल्याही परिस्थितीत शासकिय बेकायदेशीर हस्तक्षेप होणार नाही, याकडे लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे.

वरीलप्रमाणे २०१२ हे वर्ष आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष म्हणून साजरे करीत असताना उत्तम संकल्पनांची पाठराखण प्रत्येकाच्या हातून व्हावी व प्रत्येकाची सहकारी संस्था म्हणजेच आपापली सहकारी संस्था म्हणजेच सहकार हा खऱ्या अर्थाने ''सहकार''च राहील असा संकल्प आपण ह्या आर्थिक सहकारी वर्षात करूया.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार!!!**